# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ३१.०७.२०२६ शुक्रवार**

**सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा निरोप समारंभ संपन्न :—**

दिनांक ३१.०७.२०२६ चे ११.३० वा. नागपुर पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस भवन, ऑडोटोरीयम येथे जुलै—२०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा निरोप समारंभ कार्यक्रम मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अध्यक्षतेखाली तसेच, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), व मा. श्रीमती सुनिता मेश्राम, सहायक पोलीस आयुक्त, मानव संसाधन विभाग, नागपूर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजीत करण्यात आलेला होता. सेवानिवृत्त होणारे सहायक पोलीस आयुक्त, पोलीस उप निरीक्षक, प्रशासकीय अधिकारी, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार व पोलीस अंमलदार पदावरील एकुण **३२** अधिकारी आणि अंमलदार यांना सहपरिवार भावपुर्ण निरोप देण्यात आला.

याप्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस खात्यातील योगदानाचे कौतुक केले. तसेच, समाजात कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता सेवानिवृत्त पो. अधिकारी व अंमलदार यांनी दिलेल्या बहुमुल्य सेवेबद्यल पोलीस दलातर्फे कृतज्ञता व्यक्त केली. सेवानिवृत्तांना पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा देवुन, आहार कसा असावा याबद्यल मार्गदर्शनही केले आणि निरोगी आयुष्याकरीता व्यायामाचे महत्व समजावून सांगितले. कर्तव्यदक्षतेने व प्रामाणिकपणे पोलीस दलात सेवा दिल्याबद्यल मा. पोलीस आयुक्त यांनी तसेच, इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व सेवा प्रमाणपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

दिर्घकाळ एकत्र काम केल्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या सहकाऱ्यांबद्यल बोलतांना अनेक पोलीस अंमलदार यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ज्यामुळे निरोप समारंभस्थळी वातावरण काहीसे भावनिक झाले होते. उपस्थित सर्वांनी सेवानिवृत्तांना त्यांचे पुढील सुखी, समृध्द आणि निरोगी आयुष्यासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या. या निरोप समारंभाचा क्षण हा आमचे कायम स्मरणात राहील, अशा प्रकारची भावना सर्व सेवानिवृत्त अधिकारी, अंमलदार तसेच, त्यांचे कुटुंबियांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता मानव संसाधन विभाग व पोलीस मुख्यालय येथील अधिकारी व अंमलदार यांनी परिश्रम घेतले.










**(कामगिरी)**

**कोराडी पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०७.२०२६ चे ०१.०० ते ०१.२५ वा. चे दरम्यान, कोराडी पोलीसांना माहिती मिळाली की, एका काळ्या रंगाच्या कारमधुन केळवद कडून नागपूरकडे गोवंशीय जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन कोराडी पोलीसांनी, पोलीस ठाणे हद्दीत, कारमोरे संकुल टि पॉईन्ट, महादुला येथे सार्वजनिक रोडवर सापळा रचून, नमुद गाडीचा शोध घेतला. प्राप्त वर्णनाची गाडी जाताना दिसून आल्याने, त्यास थांबण्याचा इशारा केला असता, वाहनचालकाने त्याचे ताब्यातील वाहन न थांबविता, तेथून भरधाव पळून गेला. नमुद कार चालकाने कार सावनेर ते भंडारा रोडवरील बोकडे सावजी भोजनालयाचे विरुध्द दिशेने सर्व्हीस रोडने भंडाराकडे भरधाव वेगाने नेत असताना, कार रोडचे बाजुचे डिव्हायडरला धडकल्याने, वाहनचालक वाहन सोडून तेथून पोलीस येण्याअगोदर पळून गेला. पाठलाग करणारे पोलीसांनी तेथे पोहोचून नमुद कारची पंचासमक्ष पाहणी केली असता, वाहन हे होंडा कंपनीची कार क्र. एमएच ०१ एई १२८५ असल्याचे दिसून आले. त्यामध्ये ०३ लहान व ०४ मोठी असे एकूण ०७ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निर्दयतेने कोंबुन ठेवल्याचे दिसुन आले. आरोपी हा गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता त्यांची अत्यंत दाटीवाटीने वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरुन ०७ गोवंशीय जनावरे व होंडा सिवीक कार असा एकुण किंमती अंदाजे २,११,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गौशाला येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोहवा. नरेंद्र खांबलकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपींविरूध्द कलम ५,९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६०, सहकलम १३४,१७७,१८४ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. श्री गणेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात, पोउपनि. तुषार नवले, पोहवा. ज्ञानेश्वर खांबलकर, अमित, पोअं. निलेश व धिरज यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०७.२०२६ चे ००.३० वा. ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट क्र. १०३, पवनपुत्र नगर, सावली अम्मा दर्गाह रोड, दिघोरी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी चंद्रकात सुभाष जुनघरे, वय ३२ वर्ष हे आपले राहते घरात परिवारासह झोपलेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे समोरील दारातुन घरात प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख २५,०००/—रू., ०२ मोबाईल फोन तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,५३,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाकडे ७५८८५३७१९२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे अंबाझरी</u> :–** सौ. पल्लवी शुभम ठाकरे, वय २५ वर्षे, रा. पांढराबोडी पोलीस चौकी जवळ, बुध्द विहार गल्ली, अंबाझरी, नागपूर ह्या राहते घरी घरगुती भांडण करून, दिनांक २८.०७.२०२६ चे २३.०० वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ६ इंच, केस– काळे लांब, अंगात– काळ्या लाल रंगाचा सलवार सुट व पायात निळ्या रंगाची चप्पल घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळख– उजव्या हातावर पल्लवी शुभम ठाकरे नांव गोंदलेले आहे.



सौ. पल्लवी

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०७०१५१ /१९९९ | कलम ३८१ भा.दं.वि. | यादवराव देवाजी कुंभारे, रा. वैशालीनगर, बिनाकी, मंगळवारी, कुकर कंपनी जवळ, लक्ष्मण खापेकरचे घरी किरायाने, पाचपावली, नागपूर. | ०३.०८.२०२६ |
| २. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०५०१६८ /२००१ | कलम ४,२५ भा.ह.का | दिनेश हिरा मारखंडे, रा. मिनीमाता नगर, कळमणा, नागपूर. | ०७.०८.२०२६ |
| ३. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०२२५४/ २०११ | कलम ४९८ अ, ३४, ३२३, ५०४ भा.दं.वि. | १)श्रीमती शिल्पा नारायण धावडे, २) सौ. रमाबाई नारायण धावडे, दोन्ही रा. चिखली, एनआयटी बिल्डींग जी/आय, क्वॉर्टर क्र. ६, डॉ. बोबडेच्या घराजवळ, कळमणा, नागपूर. | ०७.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३१२७२८/ २००६ | कलम २७९,३३७, ३०४ अ, भा.दं.वि. | दिलीप जे. पिल्लेवार, रा. गरोबा मैदान, बुध्द विहार जवळ, लकडगंज, नागपूर. | १०.०८.२०२६ |
| ५. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०२९४५/ २००९ | कलम ४५७,३८०, ५११ भा.दं.वि. | १) साजिद खान लतिफ खान, २) युसुफ खान तजीम खान, दोन्ही रा. काली चौक, गोंडी मोहल्ला, शिवनी, मध्यप्रदेश., ह.मु.– चिखली म्हाडा क्वॉर्टर क्र. २९३, नागपूर. | ११.०८.२०२६ |
| ६ | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०२३२७/ २००९ | कलम ३७९, भा.दं.वि. | बबलु दिपचंद भलावी, रा. कळमणा मार्केट यार्ड, तिवारी कॅन्टीन समोर, कळमणा, नागपूर. | ११.०८.२०२६ |
| ७ | मा. जिल्हा न्यायाधीश –१७ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर.. | १०००८०/ २०१० | कलम १३५,१३८ भा.वि.का. | रफीक अहमद कुरेशी, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट क्र. ५९, अब्दुल हमीद नगर, यशोधरानगर, नागपूर. | १७.०८.२०२६ |
| ८. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.. | ३०२३४१/ २००६ | कलम १४७,१४८, १४९, ३२३, ३२५ भा.दं.वि. | १) देवेंद्र राजु यादव, वय २१ वर्षे, रा. सुपरक्लिनर, घाट रोड, इमामवाडा, नागपूर. २) सोयफ अमिर जाफर अली, रा. शिक्षक कॉलनी, जाफरनगर, गिट्टीखदान, नागपूर. ३) राजा जमशेख शरीफ, रा. प्लॉट क्र. ३८, अहबाब कॉलनी, गिट्टीखदान, नागपूर. ४) धमेंद्र दिलीप श्रीवास्तव रा. प्लॉट क्र. १३, टिमकी, खान सर चे घराजवळ, तहसील, नागपूर. | ११.०८.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**